# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.08.2025** **वारःशनिवार**

---

1. 79व्या स्वातंत्रदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांचं दमदार संबोधन.
2. जीएसटी दरांमधील सुधारणांच्या संकेताचे व्यापार जगताकडून स्वागत
3. पुतीन आणि ट्रम्प यांच्यातील महत्त्वाची शिखर परिषद कोणत्याही कराराविना संपन्न
4. देशभरातल्या दीड हजार टोल नाक्यांवर आजपासून फास्ट टॅगच्या वार्षिक पासची सुविधा मिळणार आणि
5. जेरूसलेममधील ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अंकिता ध्यानीची स्टीपलचेस प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी

**<u>पंतप्रधान-लाल किल्ला</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल 79व्या स्वातंत्रदिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आलं. त्यानंतर पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून देशवासियांना संबोधित करताना अनेक मुद्द्यांना स्पर्श केला. त्यामध्ये ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी उत्पादनांपासून ते लखपती दीदींपर्यंतच्या यांचा समावेश होता.

देशाच्या कणखर भूमिकेवर ठाम राहाताना पंतप्रधानांनी, देश कोणत्याही आण्विक हल्ल्याच्या धमक्यांना भीक घालणार नाही असं ठणकावलं. सशस्त्र दलांना निर्णय घेण्याची मुभा दिली असून, त्यांना सरकारचा पूर्ण पाठिंबा असल्याचं त्यांनी सांगितलं. पाकिस्तानबरोबर झालेला सिंधू करार गेली सात दशके शेतकऱ्यांचे नुकसानच करत आल्याचे सांगून, सिंधू नदीच्या पाण्यावर केवळ भारताचाच हक्क असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आत्मनिर्भर भारत हे विकसित भारताचं सामर्थ्य असून, विकसित भारताच्या उभारणीसाठी देशातल्या युवा पिढीने योगदान देण्याचं आवाहन केलं. देशाने सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्रात मोठे यश मिळवले असून, या वर्षाच्या शेवटी भारतीय चिप बाजारात येतील. त्याशिवाय स्वच्छ उर्जा, खनिजे, अवकाश ही क्षेत्रेही लवकरच काबीज करण्याचा विश्वास मोदींनी व्यक्त केला. देशातले तरूण हेच विकसित भारताचा आधार असल्याचे सांगून पंतप्रधानांनी युवकांसाठीच्या नव्या योजनेची घोषणा केली. गेल्या 11 वर्षांत उद्यमशीलतेला प्रोत्साहन मिळत असल्याचं सांगून लाखो स्टार्टअप्स देशभरात सुरू झाल्याचं त्यांनी सांगितलं. विशेषतः मुलींना मुद्रा कर्ज योजनेचा फायदा झाल्याचं ते म्हणाले. गेल्या दहा वर्षात महिला स्वमदत गटांनीही अफाट कामगिरी केल्याचं सांगून, देशातल्या युवकांना नव्या कल्पना राबवा, त्यामध्ये मी साथ देईन असंही आश्वस्त केलं.

देशात होत असलेल्या बेकायदेशीर स्थलांतरांमुळे निर्माण होणारा धोका लक्षात घेऊन, जनगणनेसंदर्भात युद्धपातळीवर मोहीम हाती घेण्यात येणार असल्याची घोषणा काल पंतप्रधानांनी केली. स्थलांतरीतांच्या प्रश्नामुळे देशाच्या लोकसंख्याशास्त्रात बदल केला जात असल्याने नव्या संकटाचा धोका असल्याचं सांगून देशवासियांना सावध केलं.

**व्यापार जगत**

स्वातंत्र्यदिनाच्या संबोधनामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीएसटीमध्ये सुधारणा करून, उद्योगजगत आणि सामान्य नागरिकांवरचा बोजा कमी करण्याचे संकेत दिले. जीएसटी सुधारणा ही काळाची गरज असल्याचे सांगून जीएसटी दरांचा आढावा घेण्याची गरज मोदींनी अधोरेखित केली होती. ते म्हणाले.....

**"पिछले 8 साल से हमने जीएसटी का बहुत बड़ा रिफॉर्म किया, पूरे देश में टैक्स के बर्डन को कम किया और आठ साल के बाद समय की मांग है, कि हम एक बार इसको रिव्यू करें, हमने हाई पावर कमेटी को बिठाकर के रिव्यू शुरू किया, राज्यों से भी विचार विमर्श किया। हम नेक्स्ट जनरेशन जीएसटी रिफॉर्म्स लेकर के आ रहे हैं, ये दिवाली के अंदर आपके लिए तोहफा बन जाएंगे।"**

पंतप्रधानांच्या या घोषणेचे उद्योग जगताकडून स्वागत झाले आहे. कर प्रणालीचे सुलभीकरण आणि व्यापाराला चालना देण्यासाठी हे अत्यंत आवश्यक पाऊल असल्याची प्रतिक्रिया उद्योग जगताकडून आली आहे. सध्या व्यापाऱ्यांना 5 ते 28 टक्के करदराला तोंड द्यावे लागत असल्याने प्रस्तावित सुधारणांमुळे व्यापाऱ्यांना मोठा दिलासा मिळेल अशी प्रतिक्रिया सदर बाजार व्यापारी संघटनेचे उपाध्यक्ष परमजीत सिंग यांनी दिली आहे.

**निर्यात कामगिरी**

भारताच्या व्यापार निर्यातीत जुलै महिन्यात उत्तम कामगिरी केल्याची नोंद झाली आहे. वार्षिक निर्यातीचा विचार करता ही वाढ 37 पूर्णांक 24 अब्ज डॉलर्स झाली आहे. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाकडून जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार, अभियांत्रिकी वस्तू, रत्ने, दागिने, इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स, सेंद्रीय आणि अजैविक रसायन या वस्तूंचा निर्यातीत वृद्धीमध्ये मोठा वाटा राहिला आहे.

**पुतीन-ट्रम्प**

रशियाचे राष्ट्रपती ब्लादीमीर पुतीन आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या अलास्कामध्ये महत्त्वाची शिखर परिषद कोणत्याही कराराविना संपली. अलास्कातील लष्करी तळावर जवळपास तीन तास झालेल्या चर्चेला मोठी प्रगती असं संबोधलं गेलं असलं तरीही या बैठकीत, युक्रेन रशिया संघर्षासंदर्भात तोडगा निघण्याची अपेक्षा फोल ठरली. बैठकीनंतर झालेल्या संयुक्त परिषदेला संबोधित करताना पुतीन यांनी चर्चेचा मुख्य मुद्दा युक्रेन संघर्ष असल्याचं सांगितलं. हा संघर्ष संपवण्यात रशियाला रस असल्याचं पुतीन म्हणाले. रशियाने संघर्षाची प्राथमिक कारणे दूर करण्याची गरज असून, युक्रेन आणि युरोपने चर्चेत अडथळा आणू नये असा इशारा त्यांनी दिला आहे. आता संघर्षाकडून संवादाकडे जाण्याची वेळ आली असल्याचं सांगून, 2022 मध्ये ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असते तर हा संघर्ष उद्भवला नसता असंही पुतीन यावेळी बोलताना म्हणाले. तर ही बैठक फलदायी झाल्याचं सांगून अनेक मुद्द्यांवर उभय देशांची सहमती झाल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी म्हटलं आहे. अमेरिका आणि रशियाला प्रगतीची खूप संधी असल्याचं सांगून युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्यासह नाटो सहकारी देशांशी दूरध्वनीवरून संवाद साधतील. हा करार या दोन्ही देशांचा निर्णय असेल आणि तो त्यांना मान्य करावा लागेल असंही ट्रम्प म्हणाले.

**कोरिया भेट**

दक्षिण कोरयाचे परराष्ट्र मंत्री चो ह्यून यांचं दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर काल दिल्लीत आगमन झालं. या दौऱ्यात ते परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्यासाठी द्वीपक्षीय चर्चा करतील. तसंच अनेक

महत्त्वाच्या कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत. परस्पर देवाणघेवाण आणि सहकार्य वृद्धींगत करण्याच्या मार्गांवर दोन्ही देशांचे नेते चर्चा करतील. उभय देशांदरम्या सेमी कंडक्टर, हरित हायड्रोजन तसंच व्यापार आणि सागरी सुरक्षा क्षेत्रात सहकार्य मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

**<u>आयएनएस सराव</u>**

श्रीलंकेच्या नौदलाची आणि भारतीय नौदलाची जहाजे आयएनएस राणा आणि आयएनएस ज्योती यांच्या संयुक्त सरावाला कालपासून श्रीलंकेत सुरुवात झाली आहे. येत्या 25 ऑगस्टपर्यंत हा सराव सुरु राहणार आहे. अशा प्रकारच्या सरावामुळे गेल्या दोन दशकांपासून दोन्ही राष्ट्रांमधील सागरी सहकार्य मजबूत होऊन परस्पर कार्यक्षमता, सागरी सहकार्य वाढवणे, संयुक्तपणे बहुआयामी सागरी ऑपरेशन्स करताना सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण करणे शक्य झालं असल्याचं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे.

**<u>फास्टटॅग</u>**

देशभरातल्या एकंदर दीड हजार टोल नाक्यांवर आजपासून फास्ट टॅगच्या वार्षिक पासची सुविधा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने लागू केली आहे. रस्ते वाहातूक आणि महामार्ग मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, योजनेच्या अंमलबजावणीच्या पहिल्याच दिवशी, एक लाख चाळी हजार लोकांनी वार्षिक पास खरेदी केले आहेत. वापरकर्त्यांना सुरळीत प्रवासाचा अनुभव मिळावा यासाठी प्रत्येक टोल नाक्यावर महामार्ग प्राधिकरण अधिकारी आणि नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहितीही मंत्रालयाने दिली आहे. या पासची वैधता एक वर्ष किंवा 200 टोल प्लाझाच्या क्रॉसिंगसाठी आहे.

**<u>जन्माष्टमी</u>**

देशभरात आज श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव साजरा केला जाणार आहे. उत्तर प्रदेशात मथुरा आणि वृंदावनामध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विशेष तयारी करण्यात आली आहे. मथुरेतल्या श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिरात तसंच वृंदावनात श्री बांके बिहारी मंदीर, प्रेम मंदीर आणि इस्कॉन मंदीरासह सर्वच मंदिरांमध्ये आकर्षक सजावट करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. गुजरातमध्ये द्वारकाधीश मंदीर, डाकोर आणि शामलजी मंदिरांमध्ये जन्माष्टमीचा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात ठिकठिकाणी मध्यरात्री श्रीकृष्ण जन्माचा सोहळा साजरा करण्यात आला. मुंबई, पुण्यासह विविध जिल्ह्यांमध्ये आज दहीहंडीचा जल्लोष पहायला मिळत आहे.

**<u>बुद्धीबळ</u>**

चेन्नई ग्रँड मास्टर्स 2025 बुद्धीबळ स्पर्धेत भारतीय ग्रँडमास्टर प्रणेश एम ने स्पर्धेचा मुकुट जिंकला आहे. अंतिम सामन्यात पराभव पत्करूनही त्याचा विजय झाला. तर विन्सेंट किमरने, रे रॉबिन्सनवर विजय मिळवला.

**<u>स्टीपलचेस</u>**

जेरूसलेम इथं सुरू असलेल्या ॲथलेटिक्स स्पर्धेत भारताच्या अंकिता ध्यानीने महिलांच्या दोन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारातील राष्ट्रीय विक्रम मोडत सुवर्णपदकाला गवसणी घातली आहे. 23 वर्षीय अंकिताने 6 मिनिटे 13 पूर्णांक 92 सेकंदाची वेळ नोंदवत राष्ट्रीय विक्रमाला मागे टाकले. या विजयामुळे टोकियो येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी 3000 मीटर स्टीपलचेससाठी पात्रता मिळवण्याच्या तिच्या संधी वाढवल्या आहेत.

**महिला क्रिकेट**

महिला क्रिकेटमध्ये, ब्रिस्बेन इथं सुरू असलेल्या एक दिवसीय क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या सामन्यात भारतीय महिलांनी विजयश्री खेचून आणली. 39 व्या षटकांत 7 बाद 193 धावांवर घसरण झालेल्या संघाला तनुजा आणि प्रेमा यांच्या जोडीच्या आक्रमक 68 धावांच्या भागीदारीने तारलं. ऑस्ट्रेलियानं केलेल्या 266 धावांचा पाठलाग करताना पडझड झालेल्या संघाला या जोडीने एक चेंडू राखून विजय मिळवून दिला.

**मुंबई भूस्खलन**

मुंबईत काल रात्री विक्रोळी परिसरात  भूस्खलनामुळे झालेल्या दुर्घटनेत दोन जणांना आपला जीव गमवावा लागला तर दोघे जण जखमी झाले. पहाटे दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. जखमींना रूग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**हवामान**

देशभरात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. येत्या दोन दिवसांत कोकण आणि गोव्यात काही ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र, गुजरात,तेलंगणा, उत्तराखंड, आसाम, मेघालय, पश्चिम मध्य प्रदेश इथं मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. येत्या दोन तीन दिवसांत विदर्भ, आंध्र प्रदेश कर्नाटकसह उत्तर भारतातही मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान हवामान विभागाने आज मुंबईत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा लाल बावटा जारी केला आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**